क्र.अ.का/प्र.अ./भूसंपादन/कावि/ ६६३ /२०१९
जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती
दिनांक-११ /०९/२०१९

**आदेश**

**वाचा :-** १.महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार- ब दिनांक ०१ ऑगस्ट २०१६
२.नविन भूसंपादन कायदा २०१३ चे कलम २५ चे परंतुक
३. उजि.(भूसं),अवप्रक्र.२, अमरावती. यांचे कार्यालयीन पत्र क्र.कावि ११९५/२०१९ दिनांक १९/०८/२०१९

**विषय :- निम्न वर्धा प्रकल्प ता. धामणगांव रेल्वे जि. अमरावती.**
मधील प्रकरणामध्ये भूसंपादन कार्यवाही करीता मुदत वाढ मिळणेबाबत.
(भू.सं.प्र.क्र.१२/४७/२०१६-१७ मौजा विटाळा ता.धामणगांव रेल्वे जि.अमरावती)

ज्याअर्थी, उपरोक्त विषयांचे अनुषंगाने, निम्न वर्धा प्रकल्पाचे कामाकरीता एकुण क्षेत्र १.६७ हे.आर खाजगी जमिन संपादित करणेकरीता मौजा विटाळा या भूसंपादन प्रकरणांअंतर्गत कार्यकारी अभियंता, निम्न वर्धा कालवे विभाग, वर्धा यांचेकडील भु.सं.प्र.क्र. १२/४७/२०१६-१७ मौजा विटाळा ता.धामणगांव रेल्वे जि.अमरावती हया प्रकरणामध्ये भूमिसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ मधील कलम ११ अधिसूचना दिनांक ३१/०१/२०१८ ला अंतिम प्रसिध्दी करण्यात येऊन तद्नंतर कलम १९ अधिसूचना दि. १५/०८/२०१८ ला अंतिम प्रसिध्दी करण्यात आली. कलम २१ (१) (२) च्या नोटिस काढुन संबंधित सर्व भूधारकांना बजावण्यात आल्या त्यावर संबंधित यंत्रणेकडून आक्षेप अभिप्राय विहीत मुदतीमध्ये प्राप्त झाले नाही. तसेच यंत्रणेकडुन रु. ३८,६२,१५२/- एवढा निधी प्राप्त झाला उर्वरित लागणारा निधी यंत्रणेकडुन अप्राप्त असल्यामुळे प्रकरणामध्ये पुढील कार्यवाही करता आली नाही त्यामुळे दिनांक १४/०८/२०१९ ला प्रकरण प्रारुप निवाडा स्तरावर व्यपगत होत असल्याने भूसंपादन कायदा २०१३ अंतर्गत महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-४ब दिनांक ०१/०८/२०१६ प्रमाणे नियम १४(१) मधील परंतुकानुसार भूमी संपादनाच्या खर्चासंबंधिची उर्वरित रक्कम ही अंतिम निवाडा कार्यवाही पूर्वी जमा करणे आवश्यक आहे, त्याशिवाय अंतिम निवाडा कार्यवाही करता येत नाही, अशी तरतूद आहे.

ज्याअर्थी, नविन भूसंपादन अधिनियम २०१३ चे कलम २५ चे तरतुदीमधील परंतुकानुसार समुचित शासन कलम १९ चे प्रसिध्दीनंतर निवाडा जाहिर करण्याबाबतचा १२ महिन्यांचा कालावधी योग्य कारणांसह पुढे वाढवू शकते, अशी तरतुद आहे.

19/10/19

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाची दिनांक ११/०९/२०१५ चे राजपत्रकात प्रसिध्द अधिसूचना क्र.संकिर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७(भाग२)/अ-२, दिनांक ११/०९/२०१५ नुसार जिल्हाधिकारी यांना १०००० हे.आर क्षेत्रापर्यंतचे क्षेत्रापेक्षा जास्त नसलेला भूसंपादनासाठी समुचित शासन म्हणून घोषित केलेले आहे.

आणि ज्याअर्थी, सर्व बाबीमुळे प्रकरणामध्ये मुदतवाढ मिळणे आवश्यक असल्याचे संबंधित यंत्रणा तसेच उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), अ.व.प्र.क्र.२,अमरावती यांचेकडुन भूसंपादन कार्यवाहीस मुदतवाढ मिळणेकरीता विनंती करण्यात आली आहे.

त्याअर्थी, आता, उपरोक्त प्रकरणामध्ये वरीलप्रमाणे, विनंती केल्यानुसार व उक्त वस्तुस्थितीनुसार भूसंपादन अधिनियम २०१३ मधील कलम २५ अंतर्गत तरतूदीनुसार भूसंपादन कार्यवाही करीता समुचित शासन म्हणून कलम १९ चे प्रसिध्दीनंतर निवाडा जाहिर करण्याची मुदत (१२ महिने) संपल्यानंतर निवाडा जाहिर करण्यास्तव दिनांक १४/०८/२०१९ नंतर पुढील १२ महिनेपर्यंत मुदतवाढ प्रदान करीत आहे. याबाबत सर्व संबंधितांनी योग्य कार्यवाही करावी .

11/10

**समुचित शासन तथा**
**जिल्हाधिकारी अमरावती**

**प्रति,**
**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),**
**अ.व.प्र.क्र.२ , अमरावती**

**<u>प्रतिलिपी</u>** :-१. मा.विभागीय आयुक्त,अमरावती यांना माहिती करीता सविनय सादर.
२. जिल्हा पुनर्वसन अधिकारी,अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करीता.
३. कार्यकारी अभियंता, निम्न वर्धा कालवे विभाग, वर्धा यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करीता.

स्वा/-

**समुचित शासन तथा**
**जिल्हाधिकारी अमरावती**